# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०–२५६०११८९
२५६०११९०
टेलीग्राफ : 'युनिपुना'
टेलेक्स : १४५ ७७१९ युनीप इन
फॅक्स नं. : ०२०–२५६९७३८८
संकेतस्थळ: www.unipune.ernet.in

गणेशखिंड,पुणे ४११००७

आरक्षण कक्ष
संदर्भ क्र. आरक्षण/ओ २२/९४२
दिनांक – ९/८/२०११

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय –'वैश्यवाणी' व 'कुलवंत वाणी' या जाती समुहास इतर मागासवर्गामधून वगळण्यात आल्याबाबत.
संदर्भ–उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण–२०११/(१३३/११)/समन्वय, दि. २८ जुलै २०११.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, 'वैश्यवाणी' व 'कुलवंत वाणी' या जाती समुहास इतर मागासवर्गामधून वगळण्यात आल्याबाबत शासनाने निर्गमीत केलेला शासन निर्णय क्र.सीबीसी–१०/२०१०/प्र.क्र.१०४/मावक ५, दि. १९ जुलै २०११ सोबत जोडत आहे. तरी सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही व्हावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

9/8/2011.
सहा.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

सोबत – वरीलप्रमाणे

दिनांक-५/८/११ 1232

# महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-२०११/(१३३/११)/समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- २७ जुलै, २०११

मा. कुलसचिव कार्यालय
पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक क्र.-आर/ 659
04/08/11
04/08/11

कुलगुरु कार्यालय
पुणे विद्यापीठ
आवक क्र. व्होसी/ 3238
आवक दिनांक: 02/08/2011
जावक दिनांक: 08/08/2011

प्रति,
सर्व संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
सर्व कुलगुरु, अकृषी विद्यापीठे.

आरक्षण

विषय :- "वैश्य वाणी" व "कुलवंत वाणी" या जाती समुहास इतर मागासवर्गामधून वगळण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा दिनांक १९ जुलै, २०११ चा शासन निर्णय सोबत जोडला आहे.

सदर शासन निर्णयात दिलेल्या आदेशांनुसार "वैश्य वाणी" व "कुलवंत वाणी" या जाती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १९ जुलै, २०११ पासून इतर मागास प्रवर्गातून वगळण्यात आलेल्या आहेत. तेव्हा सर्व शैक्षणिक संस्थांना आवश्यक त्या सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात, ही विनंती.

(दि. धों. तिवरेकर)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. सर्व सह / उप सचिव / कार्यासन अधिकारी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२. मा. प्रधान सचिव (उवतंशि) यांचे स्वीय सहायक.

"वैश्य वाणी" व "कुलवंत वाणी" या जाती समुहास इतर मागासवर्गामधून वगळण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक -सीबीसी-१०/२०१०/प्र.क्र. १०४/ मावक-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक :१९जुलै, २०११

वाचा : १) शासन पत्र क्रमांक-सीबीसी-१४८९/८१८२ (४०)/ मावक-५,दि. २७/४/१९८९
२) शासन पत्र क्रमांक-सीबीसी-१४८९/८१८२ (४०)/मावक-५, दि. २८/१०/१९८९
३) शासन निर्णय क्रमांक-सीबीसी-१०९३/ १४९२/ प्र.क्र.२८/मावक-५,दि. ९/८/१९९५
४) शासन निर्णय क्रमांक-सीबीसी-१४९६/ प्र.क्र.३८/मावक-५, दि. २१/८/१९९६
५) शासन परिपत्रक क्रमांक-सीबीसी-१०/२००७/ प्र.क्र.१७७/मावक-५,दि.२०/६/२००८

प्रस्तावना :

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ याचिका क्रमांक-४३३५/०७ श्री. विश्वनाथ पांडुरंग महाडेश्वर विरुध्द राज्य शासन व इतर यामध्ये न्यायालयाने दि. १/१०/२०१० रोजी दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये "वैश्य वाणी" व "कुलवंत वाणी" या जाती समाजाचा इतर मागासवर्गामध्ये केलेला समावेश योग्य कार्यपध्दतीनुसार झालेला नसल्याचे आदेशित केल्याने, सदर दोन्ही जाती या इतर मागासवर्गीय प्रवर्गातून वगळण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ याचिका क्रमांक-४३३५/०७ श्री. विश्वनाथ पांडुरंग महाडेश्वर विरुध्द राज्य शासन व इतर यामध्ये दि. १/१०/२०१० रोजी दिलेल्या निर्णयानुसार शासन स्तरावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे :-

१) "वैश्य वाणी" व "कुलवंत वाणी" या जातीसमुहाबाबत दिनांक २७/४/१९८९, २८/१०/१९८९, २१/८/१९९६ व २०/६/२००८ ची शासन पत्रे/ शासन निर्णय/ शासन परिपत्रके ही रद्द करण्यात येत आहेत. तसेच शासन निर्णय दिनांक ९/८/१९९५ च्या परिशिष्ट "ब" मधील "वैश्य वाणी" व "कुलवंत वाणी" या जातीसमुहाचा उल्लेख असलेली अनुक्रमांक ५ वरील नोंद रद्द करण्यात येत आहे.

२) "वैश्य वाणी" व "कुलवंत वाणी" या जाती समाजाला इतर मागासवर्ग प्रवर्गामधून (शासन आदेश पारित केल्याच्या दिनांकापासून) वगळण्यात येत आहे. तसेच, राज्याच्या इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या यादीतील अ.क्र.१९० येथे नमूद केलेली "वैश्य वाणी" , "कुलवंत वाणी" जातीची नोंद वगळण्यात येत आहे.

३) "वैश्य वाणी" व "कुलवंत वाणी" या जाती समाजाला सन १९८९ पासून इतर मागासवर्ग प्रवर्गाचे लाभ अनुज्ञेय होते. इतर मागासवर्ग प्रवर्गाचे सदर सर्वसाधारण लाभ, हा शासन निर्णय निर्गमीत झाल्याच्या दिनांकापासून त्यांना अनुज्ञेय असणार नाहीत.

४) शासकीय / निमशासकीय सेवेत इतर मागासवर्गासाठी राखीव असलेल्या पदावर "वैश्य वाणी" व "कुलवंत वाणी" या जातीतून नियुक्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सेवेत नियुक्त झालेल्या दिनांकापासून खुल्या प्रवर्गाचे समजून बिंदू नामावली यादीत त्यांना खुल्या प्रवर्गाचे बिंदूवर दर्शविण्यात यावे.

५) स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत मागासवर्गासाठी राखीव असलेल्या प्रभागाच्या जागेवर निवडून आलेल्या "वैश्य वाणी" व "कुलवंत वाणी" या जातीच्या उमेदवाराचा कार्यकाल, जातीप्रवर्गात झालेल्या बदलामुळे संपुष्टात येणार नाही.

६) सन १९८९ पासून "वैश्य वाणी" व "कुलवंत वाणी" या जाती समाजाला इतर मागासवर्ग प्रवर्गाचे जे सर्वसाधारण लाभ अनुज्ञेय होते व जे लाभ त्यांना मिळालेले आहेत, ते लाभ वा सवलती मागील परिणामाने काढून घेण्यात येऊ नयेत.

७) सदर शासन निर्णय, निर्गमित झालेल्या दिनांकापासून अंमलात येईल.

राज्य शासनाच्या वेबसाईटवर **(www.maharashtra.gov.in)** सदर शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०७१९१९१५४३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(दिनेश वाघमारे)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा. राज्यपाल यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव

मा. मंत्री/राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विजाभज) यांचे खाजगी सचिव
मा. विरोधी पक्ष नेते, विधान सभा, विधान भवन, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेते, विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर.
सर्व सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्यसचिव, मंत्रालय, मुंबई.
मुख्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
मुंबई महानगर दंडाधिकारी, मुंबई
सचिव, गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली
सर्व विभागीय आयुक्त
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
सर्व मंत्रालयीन विभाग,

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर आदेश त्यांचे अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांचे निदर्शनास आणून द्यावेत.

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक / प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी / सर्व उप जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
विभागीय समाजकल्याण अधिकारी यांचे कार्यालय, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपुर, अमरावती, लातुर
अध्यक्ष / सदस्य / सदस्य सचिव तथा संशोधन अधिकारी, सर्व विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या क्र.१, २ व ३
सदस्य सचिव,राज्य मागासवर्ग आयोग,महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी / सर्व समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
आयुक्त, सर्व महानगर पालिका
मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका
सर्व कार्यासन, सा.न्या. व वि.स. विभाग, मंत्रालय, मुंबई.

महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

यांना विनंती की, त्यांनी सदर शासन निर्णयास व्यापक प्रसिध्दी द्यावी.

निवड नस्ती, का मावक-५

* पत्राद्वारे.